# प्रसिध्दीपत्र

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-०१ यांचे मार्फत दि.२५ ऑक्टोबर २०२१ ते दि.२९ ऑक्टोबर २०२१ या कालावधीत शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (प्रथम सत्र) ऑक्टोबर २०२१ (टंकलेखन व लघुलेखन) महाराष्ट्र व गोवा राज्यातून १४० केंद्रांवर घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेची प्रवेशपत्रे परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर संस्था लॉगिनव्दारे दि.१५/१०/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात येत आहेत.

संबंधित टंकलेखन व लघुलेखन संस्थाचालकांनी त्यांच्या संस्थेतील सर्व परिक्षार्थ्यांची प्रवेशपत्रे संकेतस्थळावरून डाऊनलोड करून शिक्का व स्वाक्षरीसह संबंधित परीक्षार्थ्यांना वितरीत करण्याची व्यवस्था करावी. **विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर येताना प्रवेशपत्रासोबत परीक्षा परिषदेने पुरविलेल्या नमुन्यातील स्वयंघोषणापत्र आणणे आवश्यक आहे.**

तसेच अधिसूचनेत नमूद केल्याप्रमाणे ज्या विद्यार्थ्यांचे स्वत:चे नाव, आडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव, फोटो बदल, सही बदल इ. बाबत दुरूस्ती असल्यास अशा संबंधित संस्थाचालकांनी सोबत दिलेल्या कृतीओघ तक्त्यानुसार (Flow Chart) प्रत्येक चुकीस रु.२००/- शुल्क आकारून ऑनलाईन पध्दतीने दुरूस्तीची कार्यवाही करावी. ऑनलाईन प्रवेशपत्रातील दुरूस्ती केल्यानंतर दुरूस्त केलेल्या प्रिंटची प्रत संबंधित संस्थाचालकांनी साक्षांकित करून विद्यार्थ्यांच्या मूळ प्रवेशपत्रासोबत विद्यार्थ्यास देणे आवश्यक आहे.

तसेच अधिसूचनेत नमूद केल्याप्रमाणे ज्या विद्यार्थ्यांचा विषय बदल करावयाचा आहे त्या संस्थाचालकांनी (विद्यार्थ्यांचा फोटो व ओळखपत्रासह) समक्ष या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन प्रवेशपत्रावर सक्षम प्राधिकारी, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांची सही व शिक्का घ्यावा, तरच संबंधित विद्यार्थ्यास परीक्षेत प्रविष्ठ होता येईल.

सर्व परीक्षार्थ्यांनी त्यांची ऑनलाईन प्रवेशपत्रे आपल्या टंकलेखन/लघुलेखन संस्थेतुन परीक्षेपूर्वी हस्तगत करावे. **परीक्षा सुरू झालेनंतर कोणतीही दुरूस्ती करून दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.**

**१. कृतीओघ तक्ता (Flow Chart)**

**२. स्वयंघोषणापत्र.**

(तुकाराम सुपे)
आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-०१.

दिनांक :- १४/१०/२०२१
स्थळ :- पुणे

JCC EXAM/OCT-2021/PRASIDHIPATRAK

## शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (प्रथम सत्र) ऑक्टोबर २०२१ परीक्षेतील प्रवेशपत्रावरील दुरूस्तीबाबत करावयाची कार्यपध्दती

www.mscepune.in या वेबसाईटला भेट देणे.

⇩

GCC-TBC Tab वर क्लिक करणे.

⇩

संस्था कोड व पासवर्ड टाकून लॉगीन करणे.

⇩

GCC TAB वर क्लिक करणे.

⇩

GCC EXAM OCT. - 2021 Hallticket Correction Tab वर क्लिक करणे.

⇩

Edit बटणावर क्लिक करून विद्यार्थ्यांचे फक्त प्रथम नाव, वडिलांचे नाव, आडनाव व आईचे नाव, फोटो बदल यापैकी कोणतीही दुरूस्ती करता येईल. (विद्यार्थ्यांच्या कोणत्याही नावामध्ये संपूर्ण बदल करता येणार नाही.)

⇩

GCC EXAM OCT. - 2021 Hallticket Correction Payment Tab वर क्लिक करून Proceed to Payment बटनावर क्लिक करणे.

⇩

Enter Payment Details

⇩

Download Payment Transaction Receipt

# स्वयंघोषणापत्र

मी श्री. / श्रीम.................................................................................................

बैठक क्रमांक :- ........................................ प्रमाणित करतो / करते की, दिनांक २५/१०/२०२१ ते २९/१०/२०२१ या कालावधीत होणाऱ्या शासकीय वाणिज्य टंकलेखन व लघुलेखन प्रमाणपत्र परीक्षा (जीसीसी) स्वेच्छेने देत आहे. मला कोविड-१९ संबंधित कोणतीही लक्षणे (सर्दी, खोकला, ताप, श्वास घेण्यास त्रास इ.) नाहीत. मला कोरोना विषाणूचा संसर्ग झाल्यास महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे कोणताही वैद्यकीय खर्च देण्यास बांधिल नाही. मी दिलेली माहिती अचूक व खरी आहे.

केंद्राचे नाव :-

केंद्र क्रमांक :-

विषय व बॅच क्रमांक :-

दिनांक :-

विद्यार्थ्याची / विद्यार्थिनीची स्वाक्षरी :-